## BOMBAY ACT No. LXXII OF 1958.

## THE HYDERABAD AGRICULTURAL INCOME-TAX (BOMBAY REPEAL) ACT, 1950.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति तारीख ३ ऑक्टोबर १९५८ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. LXXII OF 1958.

## AN ACT TO REPEAL THE HYDERABAD AGRICULTURAL INCOME-TAX ACT, 1950.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ७२ वा.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ६ ऑक्टोबर १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

हैद्राबाद कृषि उत्पन्न-कर अधिनियम, १९५० रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, हैदराबाद कृषि उत्पन्न-कर अधिनियम, १९५० रद्द करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. ह्या अधिनियमास हैदराबाद कृषि उत्पन्न-कर (मुंबईचा रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५८ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. हैदराबाद कृषि उत्पन्न-कर अधिनियम, १९५० (ज्याचा यांत पुढें सन १९५०चा "उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे) याद्वारें रद्द करण्यांत येत आहे. हैदराबाद अधिनियम क्रमांक १३ रद्द करणें.

३. (१) उक्त अधिनियम रद्द करण्यांत आला तरी, कृषि उत्पन्न-कर बसविण्याच्या, आकारण्याच्या (यांत फेरआकारणीचाहि समावेश होतो), व गोळा करण्याच्या किंवा परत करण्याच्या कारणांसाठीं, किंवा मागील वर्षांबाबत (तारीख ३१ मार्च १९५८ रोजीं संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या आकारणीच्या संबंधांत) किंवा तत्पूर्वीच्या कोणत्याहि कालावधीच्या बाबतींत उक्त अधिनियमाखालील कोणत्याहि दंडाच्या किंवा इतर कोणत्याहि रकमेच्या कारणांसाठीं, बचाव.

आणि उपरोक्त कारणांपैकीं कोणत्याहि कारणाशीं संबंध असलेल्या किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या इतर कोणत्याहि कारणासाठीं तो अधिनियम व तदन्वयें किंवा तदनुसार केलेले नियम व दिलेले आदेश अंमलांत असल्याचें चालू राहील.

(२) पोट-कलम (१) मधील उपबंधांस बाध न येऊं देतां व त्यांस अधीन राहून, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, याचें कलम ७ हें, जणूं तो अधिनियम मुंबई अधिनियमाद्वारें रद्द करण्यांत आलेला अधिनियम आहे असें समजून, उक्त अधिनियम रद्द करण्याच्या बाबतींत लागू होईल.

अडचणी दूर करणें.

(४) ह्या अधिनियमाचें उपबंध अंमलांत आणतांना कोणतीहि अडचण निर्माण झाल्यास, राज्य सरकारला, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारें, ती अडचण दूर करण्यासाठीं त्यास आवश्यक वाटेल अशी तरतूद करण्याचा किंवा असा निदेश देण्याचा अधिकार आहे.

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.